02

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

No.MED 1018/CR-245/18/EDU-2
Medical Education & Drugs Department,
G.T. Hospital New Building, 9 th floor,
G.T. Hospital Complex, Lokmanya Tilak Road,
Mumbai 400 001.
Dated: 18/08/2018

To,
Principal/Dean,
Vidarbha Youth Welfare Society's
Dental College and Hospital,
Tapovan-Wadali Road,Camp,
Amravati-444 602 (Maharashtra)

**CERTIFICATE**

[See Regulation 13(b) of the Dental Council of India (Establishment of New Dental Colleges, Opening of new or Higher Course of Study or Training and Increase of Admission Capacity in Dental Colleges) Regulations, 2006]

This is to certify that it is desirable as well as feasible to increase intake capacity of the following under graduate courses, as mentioned in the respective column at your institute.

| Sr. No. | Name of the course | Intake Capacity |
|---|---|---|
| 1 | B.D.S | From 50 TO 100 |

This certificate is being issued on the basis of the:-

1. Recommendation of the Maharashtra University of Health Sciences, Nashik, under Section 64(4) of the Maharashtra University of Health Sciences Act. 1998 (Read With Section 65(5) of the Said Act.)
2. Report of the Inspection Committee constituted by the Director of Medical Education and Research, Maharashtra State, Mumbai.
3. Recommendation of the Director of Medical Education and Research, Maharashtra State, Mumbai.

**This Certificate shall be valid for starting the abovesaid course in next three academic years i.e.2019-20, 2020-21 and 2021-22.**

**(Surendra Chankar)**
**Deputy Secretary to Government of Maharashtra**

MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

**Copy forwarded for information & further necessary action, to:-**

1. The Secretary, Dental Council of India, Aiwan-E-Galib Marg, Kotla Road, New Delhi-110 002.
2. Director, Directorate of Medical Education & Research, Mumbai.
3. Registrar, Maharashtra University of Health Sciences, Nashik.



Rlondhates

②

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

No.MED 1021/CR-164/24/EDU-2
Medical Education & Drugs Department,
G.T. Hospital New Building, 9 th floor,
G.T. Hospital Complex, Lokmanya Tilak Road,
Mumbai 400 001
Dated: 30th January, 2025

To,
The Dean,
Vidharbha Youth Welfare Society's
Dental College & Hospital,
Tapovan-Wadali Road, Amravati- 444 602

Dental College & Hospital
Camp Road, Amravati
Date 04/02/2025
Inwords No. DCA/1150

## CERTIFICATE

[See Regulation 13(b) of the Dental Council of India (Establishment of New Dental Colleges, Opening of new or Higher Course of Study or Training and Increase of Admission Capacity in Dental Colleges) Regulations, 2006]

This is to certify that it is desirable as well as feasible to increase intake capacity of the following Post-graduate courses, as mentioned in the respective column at your institute.

| Sr. No. | Name of the course | Intake Capacity |
|---|---|---|
| 1 | M.D.S. (Periodontology) | From 02 to 05 |
| 2 | MDS (Orthodontics & Dentofacial Orthopaedics) | From 02 to 05 |
| 3 | MDS (Oral & Maxillofacial Surgery) | From 02 to 05 |
| 4 | MDS (Conservative Dentistry & Endodontics) | From 02 to 05 |
| 5 | MDS (Prosthodontics & Crown & Bridge) | From 02 to 05 |

2. This Certificate is being issued on the basis of the:-
   1) Recommendation of the Maharashtra University of Health Sciences, Nashik, under Section 64(4) of the Maharashtra University of Health Sciences Act. 1998 (Read With Section 65(5) of the Said Act.)
   2) Report of the Inspection Committee constituted by the Director of Medical Education and Research, Maharashtra State, Mumbai.
   3) Recommendation of the Director of Medical Education and Research, Maharashtra State, Mumbai.

**This Certificate shall be valid for three years from the date of issue.**

(Dr. Tushar Pawar)
**Deputy Secretary,**
**Government of Maharashtra**

**Copy forwarded for information & further necessary action to:-**

1) The Secretary, Dental Council of India, Aiwan-E-Galib Marg, Kotla Road, New Delhi-110 002.
2) Commissioner, Medical Education, Mumbai.
3) Director, Directorate of Medical Education & Research, Mumbai.
4) Registrar, Maharashtra University of Health Sciences, Nashik.
5) Select File (Shikshan 2)

MED (Essentiality)
4/02/25
DEAN
Dental College & Hospital
AMRAVATI.

Dental College & Hospital
Camp Road, Amravati
Date. 13/08/2026
Inwords No. DCP/601

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे दंत महाविद्यालय व रूग्णालय, तपोवन-वडाळी रोड, कॅम्प, जि.अमरावती

---

दंत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०२४/प्र.क्र.१६४(E-८९९४२९)/२४/शिक्षण-२
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१.
दिनांक:- १२/०८/२०२६

संदर्भ:- १) शासनाचे प्रमाणपत्र समक्रमांक दिनांक ३०/०१/२०२५.
२) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.V.१२०१७/०२/२०२६-DE, दि.१२/०३/२०२६.
३) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.V.१२०१७/०२/२०२६-DE(Pt.१), दि.२८/०४/२०२६.

प्रस्तावना :- विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे दंत महाविद्यालय व रूग्णालय, तपोवन-वडाळी रोड, कॅम्प, जि.अमरावती या महाविद्यालयामध्ये एकूण ०५ विषयात दंत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये "प्रमाणपत्र" देण्यात आले होते. त्यानुषंगाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.२ व संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास मान्यता (Letter of Permission) दिली आहे. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार उक्त संस्थेस सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता दंत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे दंत महाविद्यालय व रूग्णालय, तपोवन-वडाळी रोड, कॅम्प, जि.अमरावती या संस्थेस सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता खालील विवरणपत्रात नमूद दंत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता वाढ करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अभ्यासक्रम/विषय | विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ |
|---|---|---|
| १. | MDS (Periodontology) | ०२ वरून ०५ |
| २. | MDS (Orthodontics & Dentofacial Orthopaedics) | ०२ वरून ०५ |
| ३. | MDS (Oral & Maxillofacial Surgery) | ०२ वरून ०५ |
| ४. | MDS (Conservative Dentistry and Endodontics) | ०२ वरून ०५ |
| ५. | MDS (Prosthodontics and Crown and Bridge) | ०२ वरून ०५ |

२. उपरोक्त मान्यता ही पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहिल:-,

१. सदर दंत महाविद्यालयातील उक्त नमूद दंत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेशक्षमता ही आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी निर्धारित केल्यानुसार राहिल.
२. राज्य शासन/केंद्र शासन/मा. सर्वोच्च न्यायालय/मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.
३. शासकीय नियम/कायदा तसेच, मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
४. केंद्र शासन, भारतीय दंत आयोग, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी दंत अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

GR for MDS increased intake

DEAN
Dental College & Hospital

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोव्हिविशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. शासकीय दंत किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे मंजूर वाढीव जागांकरिता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नयेत.

९. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

१०. गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

११. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेली असल्याने संस्थेने पुढील वर्षी विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी भारतीय दंत आयोग, नवी दिल्ली/ केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक राहिल.

१२. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन क्र.१ वरील पत्रात नमूद अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून प्रस्तुत मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संदर्भित दिनांक १२/०३/२०२६ व दि. २८/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वप्ना देशपांडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली-११०००११
८. सचिव, भारतीय दंत आयोग, ऐवान-ए-गालिब मार्ग, कोटला रोड, नवी दिल्ली-११० ००२.
९. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
१३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१४. सहसंचालक (दंत), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१५. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
१७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
१८. प्राचार्य, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे दंत महाविद्यालय व रूग्णालय, तपोवन-वडाळी रोड, कॅम्प, जि.अमरावती
१९. निवडनस्ती (शिक्षण-२)